महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन बीड

खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०१
DTE CODE - 2011 ई मेल- principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ -www.gpbeed.ac.in MSBTE CODE - 032
"*Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values.*"


जा.क्र./शातंबी/कार्यालय/ /2025 /2565

दिनांक: 28 JUL 2025

प्रति,

________________________

खानावळ (मेस)सेवा पुरवठादार/ कंत्राटदार

विषय: संस्थेतील मातोश्री_मुलींचे वसतिगृहातील खानावळ मेसचे दर पत्रक मागविणे बाबत

संदर्भ: १) जा.क्र./शातंबी/कार्यालय/2025/2550 दिनांक: 25 JUL 2025

२) दिनांक २५/०७/२५ रोजीची मुलींचे वसतिगृह आणि मेस सल्लागार समितीची प्राचार्य कक्षात झालेली बैठक

महोदय,

शासकीय तंत्रनिकेतन बीड या संस्थेतील मातोश्री मुलींचे वसतिगृहातील खानावळ (मेस) सुरू करण्यासाठी इच्छुक आणि पात्र सेवा पुरवठादार/ कंत्राटदार यांचेकडून विहित नमुन्यात आणि दोन लिफाफा पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अटी व शर्ती मधील अनुक्रमांक २ नुसार मागवण्यात आलेली एकूण 11 कागदपत्रे ठेवण्यात यावीत.

लिफाफा क्रमांक २ मध्ये विहित नमुन्यातील दरपत्रक योग्य ते दर भरून आणि स्वाक्षरी करून ठेवावे. सदरील दोन्ही लिफाफे बंद करून एका मोठ्या लिफाफ्यात सील बंद करून प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन बीड या नावे दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील याची काळजी संबंधितांनी घ्यावी. मोठा लिफाफ्यावर उपहार गृह सेवेस दरपत्रक असे स्पष्ट उल्लेख करावा. उशिराने आलेल्या दर पत्रकांचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर लिफाफे दिनांक ०६/०८/२०२५ रोजी दुपारी ३. ०० वाजता वसतिगृह सल्लागार समिती सदस्या समक्ष उघडण्यात येतील. कंत्राट देण्यासाठीच्या प्रक्रियेमध्ये लिफाफा क्रमांक १ उघडून त्यामधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या सेवा पुरवठादार/कंत्राटदारांचाच पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल.

लिफाफा क्रमांक १ मधील कागदपत्रांची सेवा पूर्तता करणारा पुरवठादार/कंत्राटदारांचा लिफाफा क्रमांक २ उघडून दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येईल आणि उच्च दर्जा व न्यूनतम दर असलेल्या कंत्राटदारास वसतीगृहातील मेसचे कंत्राट देण्यात येईल.

लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारा कोणीही सेवा पुरवठादार/कंत्राटदार उपलब्ध नसल्यास वसतिगृह सल्लागार समितीच्या शिफारसीनुसार काही कागदपत्राबाबत योग्य ती सूट मुदतवाढ देऊन सदरील प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

सेवा इच्छुक आणि पात्र पुरवठादार/ कंत्राटदार यांनी निविदा अटी व शर्ती आणि विहित नमुन्यातील दर पत्रक वसतिगृह सहाय्यक श्री. बहिरवाल बी. एच. (भ्रमणध्वनी क्रमांक ९५७९३९३७६६) यांचेकडून घेऊन निविदा शुल्क रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे) संस्थेचे रोखपाल यांच्याकडे जमा करावी.

(डॉ. ए. के. वाघमारे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, बीड

प्रत: 1. संस्थेचे मुख्य सूचनाफलक 2. संस्थेची वेबसाईट

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०९
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011
MSBTE CODE - 032
*"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values."*

जा.क्र./शातंबी/कार्यालय/ /2025/2565
दिनांक 28 JUL 2025

## मातोश्री मुलींचे वस्तीगृहातील खानावळ (मेस) चालवण्यासाठी नियम व अटी

1. खानावळ (मेस) चालविण्याचा अनुभव किमान तीन (०३) वर्षांचा अनुभव असावा.
2. कंत्राट दाराकडे मेस चालविण्याकरता खालील वैध कागदपत्रे असणे आवश्यक आहे.
   a) दुकान परवाना/संस्था नोंदणी पत्र
   b) अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र
   c) वस्तू व सेवा कर विभागाचा नोंदणी क्रमांक
   d) पॅन कार्ड
   e) आधार कार्ड
   f) स्थावर मालमत्तेचा परावा
   g) बालकामगार यांची नेमणूक न करण्याचे प्रतिज्ञापत्र
   h) शा.तं. बीड या संस्थेच्या अटी व शर्ती मंजूर असल्याचे हमीपत्र
   i) दोन जबाबदार व्यक्ती (वकील/डॉक्टर इत्यादी) ओळखत असल्याचे प्रमाणपत्र (फोटोकॉपीसह)
   j) नगर परिषद यांचेकडील खानावळ (मेस) चालविण्याचे नोंदणी प्रमाणपत्र / नाहरकत प्रमाणपत्र
   k) मेस चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र (किमान ०३ वर्ष)
3. मेस मध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचे ओळख म्हणून त्या व्यक्तीचे आधार कार्ड, चारित्र्य प्रमाणपत्र आणि आरोग्य प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे वस्तीगृहात जमा करावी लागतील.
4. कंत्राटदारास कुकिंग गॅस हा शासन नियमानुसार Commercial प्रकारातील वापरावा लागेल.
5. निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छुक सेवा पुरवठादारास/ कंत्राटदारास रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे) इतके निविदा शुल्क निविदा घेतेवेळी निविदे संबंधित कागदपत्रे हस्तगत करताना संस्थेचे रोखपाल यांच्याकडे जमा करावी लागेल.
6. सेवा पुरवठादारास/ कंत्राटदारास रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) इतके बयाना रक्कम निविदा संस्थेत निविदा जमा करतेवेळी वसतिगृह सहाय्यक यांचेकडे भरणा करावी लागेल. निविदा प्रक्रियेतून अचानक माघार घेतल्यास बयाना रक्कम जप्त करून शासन खाती जमा करण्यात येईल. तसेच न्यूनतम २ सेवा पुरवठादार / कंत्राटदार यांची बयाना रक्कम काही कालावधी करिता राखून ठेवण्यात येईल. आणि बाकी निविदा भरणाऱ्यांची बयाना रक्कम तात्काळ परत केली जाईल.
7. निविदा छाननी झाल्यानंतर यशस्वी निविदाकारास संस्थेकडे अनामत रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये) स्वीकृती पत्रासोबत भरावे लागतील. तदनंतरच सेवा पुरवठादारास पुरवठा आदेश दिला जाईल.
8. निविदा निवड झाल्यानंतर प्रतिमाह भाडे रुपये १३२०/- (अक्षरी एक हजार तीनशे वीस) आकारण्यात येईल. शैक्षणीक सत्र सुरू होण्यापूर्वी (०४) चार महिन्याचे व दुसरे सत्र सुरू होण्यापूर्वी उर्वरित महिन्याचे मेस भाडे संस्थेकडे अग्रीम स्वरूपात जमा करावे.
9. संस्थेकडून जेवणासाठी फर्निचर उपलब्ध करून दिले जाईल.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०१
ई मेल – principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ – www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 MSBTE CODE - 032
"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values."

10. मेस कक्षातील विजेच्या वापरासाठी स्वतंत्र सबमीटर देण्यात येईल.प्रतिमाह विजेचा भरणा करताना संस्थेतील विद्युत विभागाकडून विद्युत देयक प्रमाणित करून घेऊन वीजबील भरणा संस्थेच्या रोखपाल यांच्याकडे करावा लागेल.
11. अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
12. कंत्राट कालावधी संपताच तुटफुटीची किंवा इतर येणे असलेली रक्कम अनामत रक्कमेतून वजा करून उर्वरित रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल. सदरील रक्कम कंत्राटदाराने कंत्राट कालावधी संपल्यानंतर एक वर्षाच्या आत घेणे बंधनकारक आहे.
13. सदरील कंत्राट कालावधी हा दहा महिने कालावधीचा राहील तदनंतर कंत्राटदाराची सेवा समाधानकारक आढळल्यास सदर कंत्राट कालावधी हा पुढे एक शैक्षणिक सत्राकरिता वाढवून देता येईल परंतु अशी मुदतवाढ कोणत्याही परिस्थितीमध्ये दोन शैक्षणिक सत्रापेक्षा अधिक नसेल.
14. कंत्राट आणि वाढीव कालावधीत कंत्राटदारास जेवणाचे दर समितीच्या शिफारशी शिवाय वाढविता येणार नाही.
15. मेसची स्वच्छता कंत्राट दारास नियमित करावी लागेल. वसतिगृह मेस मध्ये स्वच्छता, शांतता व चांगली वर्तणूक ही सर्व जबाबदारी कंत्राटदार आणि मेस कामगारांची राहील.
16. मेस मध्ये विद्यार्थी, अधिकारी- कर्मचारी तसेच संस्थेशी संबंधित व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणासही प्रवेश देता येणार नाही.
17. मेस मध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा या संस्थेवर कोणताही बोजा असणार नाही.
18. मेस मधील कर्मचारी/कामगार यांचे वेतन प्रचलित किमान वेतन दरापेक्षा कमी नसावे.
19. मेस मधील कर्मचारी/कामगार यांना संस्था परिसर किंवा मेस मध्ये कर्तव्यावर असताना धूम्रपान, नशा करता येणार नाही किंवा अशा अवस्थेत संस्था परिसरात मेस मध्ये काम करता येणार नाही.
20. मेस मधील कर्मचारी कामगार कंत्राटदार यांची संस्थेतील विद्यार्थिनी, अधिकारी -कर्मचारी इत्यादी यांच्याशी असलेली वागणूक सौजन्याची असावी.
21. मेस मधील कोणत्याही प्रकारची उधारी वसूल करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहणार नाही वसतिगृहातील कर्मचारी कामगार कंत्राटदार यांना मेस चालविणे शिवाय इतर कोणताही व्यवसाय संस्था परिसरात करता येणार नाही.
22. कंत्राटदारास मेस मधील देण्यात आलेले जागा/ क्षेत्रफळा व्यतिरिक्त संस्थेचा इतर कोणताही भाग वापरता येणार नाही.
23. मेस मध्ये काम करणाऱ्या कर्मचारी/कामगार यांना संस्थेत प्रवेश करताना आणि बाहेर जाताना मुलींचे वसतिगृहातील मुख्य गेटवरील सुरक्षा कर्मचारी यांचेकडे दैनंदिन नोंदी कराव्या लागतील.
24. मेस मध्ये प्लास्टिक कप/ प्लेट/वाटी/पिशवी इत्यादी प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा वापर करता येणार नाही.
25. मेस कक्षातील वापर करण्याकरिता देण्यात आलेले फर्निचर किंवा इतर साहित्याची तूट फुट झाल्यास त्याची भरपाई करून घेण्यात येईल.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०१
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 MSBTE CODE (32
"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values."

26. मेस कक्षात स्वच्छ पिण्याच्या शुद्ध व पिण्यायोग्य पाण्याची व्यवस्था करणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.
27. पाण्याच्या उपलब्धतेनुसार वस्तीगृहातील पाणी स्वच्छतेसाठी स्वयंपाकासाठी वापरता येईल टंचाईच्या काळात कंत्राटदारास स्वखर्चाने पाणी उपलब्ध करून घ्यावे लागेल. सदरील पाण्याचा "पाणी नमुन्यांचा सूक्ष्मजिवीय अहवाल" देणे बंधनकारक आहे.
28. जेवणाचा दर्जाची तपासणी वेळोवेळी मेस समिती करेल. जेवनाचा दर्जा निकृष्ट आढळून आल्यास मेस ताबडतोब बंद करण्यात येईल.
29. मेस मध्ये मुलींना अन्ना द्वारे बाधा (इजा) झाल्यास हे सर्व जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.
30. मेस मध्ये मुलींना शुद्ध शाकाहारी जेवण देण्यात यावे.
31. जेवणामध्ये

    <u>सकाळचे जेवण :</u> a) रस्सा भाजी/ फिके वरण/ तिखट वरण b) सुकी भाजी c) पोळी d) भात e) सॅलॅड (काकडी,टोमॅटो, बिट, लिंबू) f) लोणचे g) दही (आठवड्यातील कोणतेही ३ दिवस)

    <u>रात्रीचे जेवण :</u> a) सुकी भाजी/ रस्सा भाजी/ फिके वरण/ तिखट वरण b) पोळी c) भात/ खिचडी d) लोणचे / चटणी/ पापड इत्यादींचा समावेश असावा.
32. महिन्यातून एकदा फिस्ट देण्यात यावी व सायंकाळी हलके अन्न द्यावे.
33. मेसची वेळ सकाळी ८.३० ते १०.१५ आणि सायंकाळी ७.०० ते ९.०० अशी राहील.
34. कंत्राटदाराचा करारनामा कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा कुठले स्पष्टीकरण न देता संपुष्टात आणण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार माननीय प्राचार्य तथा सक्षम अधिकारी शांत बीड यांच्याकडे राखीव आहेत.
35. कंत्राट देण्याच्या या प्रक्रिये विषयी काही तक्रार असल्यास मा. प्राचार्य हे सक्षम तक्रार निवारण अधिकारी असतील.
36. कुठल्याही सबबी शिवाय निविदा मंजूर करणे किंवा नामंजूर करण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन बीड यांना राहतील.
37. मेस मधील कामे करण्यासाठी महिला कामगाराची नियुक्ती करावी.
38. बालकामगारांना मेस मधील कामे करण्यास सक्त मनाई आहे. बालकामगारांची नियुक्ती करू नये.

(डॉ. ए. के. वाघमारे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, बीड

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०१
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011
MSBTE CODE 032
"*Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values.*"

निविदा अर्ज क्रमांक: दिनांक:

## मातोश्री मुलींचे वसतिगृहातील खानावळ (मेस) चालविण्यासाठी निविदा अर्ज

**१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :**

**२. संपूर्ण पत्ता :**

**३. भ्रमणध्वनी क्रमांक:** **४. आधार क्रमांक :**

**५. मेस चालविण्याचा अनुभव (वर्षांमध्ये) :**

**६. अर्जदाराचे हस्ताक्षर**

**७. निविदेसोबत जोडावयाची प्रमाणपत्रे**

**८. लिफाफा क्रमांक १ :**

a) दुकान परवाना/संस्था नोंदणी पत्र

b) अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र

c) वस्तू व सेवा कर विभागाचा नोंदणी क्रमांक

d) पॅन कार्ड

e) आधार कार्ड

f) स्थावर मालमत्तेचा परावा

g) बालकामगार यांची नेमणूक न करण्याचे प्रतिज्ञापत्र

h) शा.तं. बीड या संस्थेच्या अटी व शर्ती मंजूर असल्याचे हमीपत्र

i) दोन जबाबदार व्यक्ती (वकील/डॉक्टर इत्यादी) ओळखत असल्याचे प्रमाणपत्र (फोटोकॉपीसह)

j) नगर परिषद यांचेकडील खानावळ (मेस) चालविण्याचे नोंदणी प्रमाणपत्र / नाहरकत प्रमाणपत्र

k) मेस चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र (किमान ०३ वर्ष)

**लिफाफा क्रमांक २ :**

## विहित नमुन्यातील दर पत्रक

### मेसचा मासिक शुल्क दर तक्ता

| | |
|---|---|
| **मेसचा मासिक शुल्क दर :** | **रुपये /-**<br>**(अक्षरी रुपये___________________________________)** |

सेवा पुरवठादार /कंत्राटदार यांची सहीः सेवा पुरवठादार /कंत्राटदार यांच्या संस्थेचा शिक्का

**ठिकाण :**

**दिनांक :**

टीप : सदरील दरपत्रक सेवा पुरवठादार /कंत्राटदार यांनी संस्थेच्या लेटरहेड वर टाईप करून निविदा जमा करतेवेळी मेसचा मासिक शुल्क दर लिफाफा क्रमांक २ मध्ये टाकून जमा करावे.